**Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)**

VOL- XI | ISSUE- V | MAY | 2024 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 8.02 | ISSN 2349-638x

# छत्रपती शिवाजी महाराजांची अर्थनीती- एक विश्लेषण

**प्रा. डॉ. पवार अविनाश विलासराव**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालय
सिताराम नगर लातूर
Email Id :- pavinash83@gmail.com

**प्रस्तावना**

१९९१ मध्ये उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरण (एलपीजी) चा अवलंब भारताने केला. जागतिकीकरणाने भारतीय अर्थव्यवस्था जागतिक अर्थव्यवस्थेशी जोडली गेली. जागतिक अर्थव्यवस्थेच्या माध्यमातून रोजगार उभा राहील, नोकरीव्यवसाय उभे राहतील, स्थानिक कारागिरांना, उद्योगांना जागतिक बाजारपेठ मिळेल असे वाटत होते. मात्र 1991 नंतर झालेल्या जागतिकीकरणाने येथील स्थानिकांची अर्थव्यवस्था कोलमडून पडली आहे. शेती, सहकार व छोटे उद्योग विस्कळीत झाले आहेत. गरीब व श्रीमंत यातील दरी अधिकाधिक वाढत चालली आहे. 1995 ते 2020 च्या जागतिक विषमता अहवालावरून हे स्पष्ट होते की भारतात 1995 मध्ये वरच्या 10% लोकांकडे 54.48%संपत्तीचा वाटा होता. तो 2020 मध्ये वाढून 63.90 % झाला. तर खालच्या 50 % लोकांकडे 1995 मध्ये भारताच्या एकूण संपत्ती मधील वाटा 8.31% होता तो आणखीनच घटून 2020 मध्ये 6.05% झाला याचाच अर्थ 1995 ते 2020 या 25 वर्षाच्या काळात वरच्या 10% श्रीमंत व्यक्तीच्या संपत्तीमध्ये 9.42% नी वाढ झाली आहे. तर खालच्या 50% व्यक्तीची संपत्तीत 2.26% नी कमी झाली आहे. यावरून हे स्पष्ट होते की भारतात उदारीकरण जागतिकीकरण खासगीकरण मुळे विषमता खुप वाढली आहे. गरीब आणि श्रीमंत यांच्या मधील अंतर वाढणे आर्थिक विकासाचे लक्षण नाही. या विकासाची फळे तळातील व्यक्तीला उपभोगायला मिळत नाही. थोडक्यात जागतिकीकरणामुळे राष्ट्रीय उत्पन्नात आर्थिक विकास दरात उल्लेखनीय वाढ होत आहे पण संपत्तीचे न्याय वितरण होत नाही. सर्व सामान्य लोकांच्या कल्याणात भर पडत नाही. त्यासाठी न्याय जागतिकीकरणाची गरज वाटत आहे. न्याय जागतिकीकरणासाठी शासनाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. सध्या भारतात आर्थिक विषमता वाढत आहे, नोकरीत सुरक्षितता नाही. शेती व्यवसाय अडचणीत आहे त्यामुळे समाजात असंतोष दिसून येत आहे या पार्श्वभूमीवर छत्रपती शिवाजी महाराजांची अर्थनीती समजून घेणे गरजेचे आहे. शून्यातून स्वराज्य निर्माण करून लोक कल्याणाचा विचार करणारा राज्यकर्ता त्या काळात जगात इतरत्र आढळत नाही. म्हणूनच सतराव्या शतकातील महान राजा या दृष्टीने छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेतले जाते. अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये त्यांनी रयतेसाठी कार्य केले. लोकांचे प्रश्न समस्या ते ओळखत होते. त्या सोडवण्यासाठीच त्यांनी कार्य केले याजाणता राजाची अर्थनीती समजावून घेणे आवश्यक आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

1) छत्रपती शिवाजी महाराजांची अर्थनिती जाणून घेणे.

**संशोधनाची गृहितके**

1) छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेसाठी, लोकांच्या कल्याणासाठी स्वराज्याची स्थापना केली.
2) छत्रपती शिवाजी महाराजांची राजेशाही ही लोककल्याणकारी होती.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी द्वितीय माहितीचा वापर केला आहे.

**स्वराज्य स्थापना व विस्तार**

छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेसाठी स्वराज्य उभं केले. हे स्वराज्य लोककल्याणासाठी होते. लोकांचे कल्याण

जर करावयाचे असेल तर स्वराज्याचे उत्पन्न वाढविणे गरजेचे आहे हे छत्रपती शिवाजी महाराजांनी ओळखले होते म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याच्या उत्पन्न वाढीवर लक्ष केंद्रित केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात स्वराज्याच्या उत्पन्नात लक्षणीय वाढ झालेली दिसते. प्रा. नामदेवराव जाधव यांनी "शिवाजी महाराजांचे अर्थशास्त्र" या त्यांच्या पुस्तकात स्वराज्याच्या आर्थिक प्रगती वर प्रकाश टाकला आहे. त्यांच्या मते 'केवळ तीन लाख ६० हजार रुपयांतून सुरू केलेलं स्वराज्य महाराजांच्या वयाच्या ५० व्या वर्षी तीन लाख बेचाळीस हजार कोटी रुपयांचं वार्षिक उत्पन्न घेणारं आर्थिकरित्या सक्षम राष्ट्र म्हणून उदयाला आल. ही स्वराज्याच्या उत्पन्नातील वाढ खूप चांगली असल्याने छत्रपती शिवाजी महाराजांचे अर्थशास्त्र अतिशय पक्के होते हे यावरून लक्षात येते. त्या काळातील इतर साम्राज्य चैनीच्या विलासी गोष्टीसाठी पैसा खर्च करत होते. परंतु छत्रपतींनी चैनीच्या विलासी वस्तूंसाठी स्वराज्याच्या उत्पन्नातील पैसा खर्च केला नाही तर महाराजांनी स्वराज्याची ही संपत्ती लोकांच्या कल्याणासाठी साम्राज्याच्या विस्तारासाठी वापरली. यावरून महाराजांचे आर्थिक धोरण किती योग्य असून ते लोक कल्याणासाठी होते हे लक्षात येते. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या तिजोरीत भर पडावी यासाठी मोठ्या प्रमाणात कर आकारणी केली नाही किंवा सर्वसामान्य लोकांचे शोषण केले नाही. काही प्रसंगी जर स्वराज्यात पैशाची गरज भासली तेव्हा त्यांनी सुरत व इतर सुलतानी शहरांवर धाडी घातल्या या धाडी घालण्याच्या पाठीमागचे कारण स्वराज्याची स्थापना नुकतीच झाली होती. स्वराज्याचे रोपटे लहान होते. त्याला फळे येण्यास बराच कालावधी होता. स्वराज्याचे सुलताना पासून संरक्षण करायचे होते. रयतेच्या मनामध्ये स्वराज्यावरील विश्वास बसवायचा होता. स्वराज्याला लोकशाहीला अनुकूल घडवायची होते. स्वराज्यातील शेती व्यवस्था टिकवणे आणि शेती विकास घडवून आणणे गरजेचे होते. शिवकालातील उद्योगधंद्याच्या वाढीस प्रोत्साहन द्यायचे होते. अचानक सुलतानांकडून आक्रमक कधी होईल याचा भरवसा नसायचा. शेतीव्यवस्था सुलतानी व आस्मानी या दोघांमुळे भरडून निघत असे. स्वराज्याची बरीच कामे पैशावाचून अडली होती. अशाकाळी सुलतानी शहरे हि पैशाने ओसंडून वाहत होती. श्रीमंत शहरांमधील बाजारपेठा ह्या रयतेच्या हातात नव्हत्या. सुलतान लोकांच्या हातात होत्या. बादशहा व त्याचे हितचिंतक यांनी रयतेची पिळवणूक करूनच आपली तुंबडी भरली होती. शिवाय हे जुलमी सुलतान स्वराज्याची नासाडी करत, लोकांवर जुलूम करत असत म्हणून त्यांच्यावर अंकुश बसने गरजेचे होते. स्वराज्याला विपुल धनप्राप्ती व सुल्तानांवर वचक हा दुहेरी हेतू या धाडीमधून साध्य होत असे. म्हणून राजांनी ह्या श्रीमंत शहरातील श्रीमंत लोकांवर धाडी टाकून त्यांच्याकडूनच खंडणी वसूल केली. आणि वसूल करण्यात आलेली संपत्ती लोककल्याणासाठी राबवली. गरीब रयत स्त्रिया मुले यांच्या केसालाही धक्का लावला नव्हता. युद्धात मिळवलेली लुट लपवण्याचा मोह सैनिकांना होऊ नये म्हणून शिवाजीराजे आपल्या सैनिकांना चांगला व नियमित पगार देत होते . त्यामुळे स्वराज्यामध्ये भ्रष्टाचार होत नसे परंतु सध्याच्या काळात फार मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केला जात आहे.

**शेती विषयक धोरण व कर विषयक धोरण**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात शेती हा प्रमुख व्यवसाय होता. शेतीला उत्पन्नाचा प्राथमिक स्त्रोत म्हणतात याचे ज्ञान महाराजांना होते. म्हणून छत्रपतींनी स्वराज्याच्या स्थापनेच्या सुरुवातीलाच शेती विकासाला महत्त्व दिले. शेती व शेतमजूर स्थिरस्थावर होईल असे धोरण त्यांनी सुरुवातीला आखले. यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी शेती कसणाऱ्या लोकांना जमिनीची मालकी हक्क दिले. साम्राज्यात असलेली पडीक जमीन भूमिहीनांना, तसेच ज्यांना कमी जमीन असेल त्यांना दिली. शेतकऱ्यांना जमिनीची मालकी मिळाली. तसेच या लोकांना शेती कसण्यासाठी लागणारे अवजारे साधने उपलब्ध करून दिली या पाठीमागचा उद्देश त्यांचा असा होता की पडीक जमीन लागवडीखाली आणल्यामुळे लागवडीखालील क्षेत्र वाढवून उत्पादनात वाढ होईल आणि जास्त शेतसारा मिळाल्यामुळे स्वराज्याच्या उत्पन्नात भर होईल. यावरून छत्रपती शिवाजी महाराज हे उत्तम अर्थतज्ञ होते हे लक्षात येईल. शेतकरी जेव्हा आर्थिक दृष्टिकोनातून अडचणीत येईल तेव्हा साम्राज्याची गंगाजळी शेतकऱ्यांसाठी आहे हे महाराजांनी ओळखून शेतकऱ्यांना शून्य टक्के व्याजदराने ( बिनव्याजी) कर्ज दिली. यातून शिवाजी महाराजांची अर्थनीती ही लोकांच्या कल्याणासाठी होती. सर्वसामान्य लोकांसाठी होती ही स्पष्ट होते. पडीक जमिनी दिल्या साधनसामग्री अवजारे दिले कर्ज

दिली तरी देखील शेतीतून दुष्काळामुळे किंवा इतर कारणामुळे उत्पन्न प्राप्त झाले नाही तर त्या शेतकऱ्यांनी वर्षभर कसं जगायचं याचा विचार करून छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्यातील धान्याच्या कोठाऱ्यातुन अशा शेतकऱ्यांना वर्षभर पुरेल एवढे धान्य दिले जात होते. या पाठीमागचा त्यांचा उद्देश हा शेतकरी सक्षम समृद्ध झाला पाहिजे हा होता. जेव्हा सामान्यातील सामान्य शेतकरी सक्षम समृद्ध होतो. तेव्हा त्याच्याकडून कर घ्यावा हे धोरण छत्रपती शिवाजी महाराजांचे होते. स्वराज्यातील प्रत्येक घटकाला सक्षम करायचे आणि मग त्याच्यावर कर आकारायचा हे धोरण अतिशय महत्त्वाचे होते. एखादं फुलपाखरू फुलातील गंध फुलाला कोणताही धोका किंवा इजा न पोहोचविता शोषून घेतो अगदी त्याप्रमाणे कर लावावा असे शिवरायांचे कर धोरण होते. समताधिष्ठित व प्रगतिशील न्यायाची कर आकारणीमुळे रयतेच्या उत्पादनावर उपभोगावर बचत, गुंतवणूक, उत्पादकतेवर कोणताही विपरीत परिणाम न करणारे हे धोरण महाराजांचे होते.आजदेखील याच प्रकारची कर आकारणी केली जात आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी कर आकारण्यासाठी सर्वप्रथम जमीनीची शास्त्रशुद्ध मोजणी केली, नंतर त्या जमीनीचे पीक पद्धती, उत्पादकता यानुसार सर्वेक्षण केले जाई. आणि नंतर जमिनीच्या प्रकारानुसार उत्पादकतेनुसार पिकानुसार कराचे दर ठरवून जेव्हा पिक पाणी चांगले आले तेव्हाच कर आकारला जाईल. छत्रपती शिवाजी महाराजांनी संपूर्ण न्याय मार्गाने शेतसारा वसूलीची चोख पद्धत राबवली. पुर्वी जहागीरदार वतनदार शेतकऱ्यांकडून कर गोळा केला जात होता यामुळे ते भरमसाठ कर गोळा करून शेतकऱ्यांचे शोषण करत होते त्यामुळे शेतकऱ्यांचे हाल होत असे. छत्रपती शिवाजी महाराजांनी जहागीरदार वतनदारांवर यावर पूर्ण लगाम ठेवून त्यांचे उच्चाटन केले. कराचे संपूर्ण उत्पन्न सरकारी खजिन्यात जमा व्हावे यासाठी शेतकरी प्रजा आणि शासन यांमध्ये कोणीही मध्यस्त असणार नाहीत याची त्यांनी पूर्ण खबरदारी छत्रपती शिवाजी महाराजांनी घेतली. शेतसाऱ्यासंदर्भात एका पत्रामध्ये राजे म्हणतात,"येक भाजीच्या देठासहि मन नको."यावरून शेतसारा वसूलीत अन्याय होणार नाही याची काळजी त्यांनी घेतली हे स्पष्ट होते. शेतीच्या उत्पादनाच्या 40% दराने कर आकारला जात होता मात्र दुष्काळाच्या स्थितीत किंवा जमीन नापीक झाली तर कर आकारणे अन्यायाचे होईल हे ओळखून महाराजांनी त्याच शेतकऱ्यांना दुष्काळाच्या स्थितीत कर न आकारता कराची भरपाई म्हणून त्याच्या नेहमीच्या उत्पादनाच्या 60 टक्के दराने भरपाई किंवा मदत दिली जात होती. त्यामुळे स्वराज्य हे लोकांच्या कल्याणासाठी रयतेच्या कल्याणासाठी आहे हे स्पष्ट होते. दुष्काळाच्या काळात कर न आकारता करातुन सूट देणे म्हणजेच टॅक्स हॉलिडे ची कल्पना सर्वप्रथम महाराजांनी राबवली. ती फक्त लोकांच्या हितासाठी कल्याणासाठीचं. यावरून छत्रपती शिवाजी महाराज किती थोर अर्थशास्त्र होते हे लक्षात येते. सदैव त्यांची कार्य लोकांच्या कल्याणासाठी लोकांच्या हितासाठी लोकांच्या सुखासाठीच असल्याने त्यांना जाणता राजा म्हटलं जातं . 1630 ते 1656 या काळात स्वराज्याच्मध्ये दुष्काळ सारखी स्थिती होती . या काळात महाराजांनी या दुष्काळाचा अभ्यास केला आणि दुष्काळावर मात करण्यासाठी त्यांनी कृषी विषयक धोरण आखले जे की आज आपण रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून लोकांना काम देण्यासाठी वापरतो. ते सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराजांनी कृषीचा विकास करण्यासाठी, दुष्काळावर मात करण्यासाठी वापरलेले होते. त्यासाठी त्यांचं जे धोरण होतं ते असं होतं की साम्राज्यातील प्रत्येक घरातील व्यक्तीला त्याच्या त्याच्या कुशलतेनुसार नोकरी देण्याचं महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी केलं तसेच धरणे बांधणे तलाव बांधणे विहिरीची कामे करणे रस्ते बांधणे हे काम करून साम्राज्यातील दुष्काळावर मात करून कृषीचा विकास घडवून आणण्याचा प्रयत्न छत्रपती शिवाजी महाराजांनी केला . यावरून त्यांचे शेतीविषयक व करविषयक धोरण हे लोककल्याणासाठी होते याची आपणास कल्पना येते. छत्रपती शिवाजी महाराजांनी दुष्काळावर मात करण्यासाठी जे उपाय सांगितले त्याचं उपायांना आपण भुमी सुधारणा करण्यासाठी राबविले यावरून छत्रपती शिवाजी महाराजांचे धोरणे आजदेखील सरकारला उपयोगी पडत आहेत हे यातुन स्पष्ट होते.

**उद्योग व व्यापार विषयक धोरण:-**

1956 नंतर कृषी विषयक स्थिती सुधारल्यानंतर महाराजांनी उद्योगाच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण धोरणे उभारली त्यासाठी चौल, कल्याण, भिवंडी, दाभोळ, राजापूर, वेंगुर्ले, अशा वेगवेगळ्या ठिकाणी औद्योगिक केंद्र निर्माण केली. औद्योगिक विकासासाठी आज MIDC महत्वपूर्ण

भूमिका बजावतात. तशाच प्रकारे स्वराज्यातील उद्योग व्यापाराला चालना मिळाली पाहिजे यासाठी महाराजांनी औद्योगिक केंद्र उभारली. उद्योग व्यापारांना चोरांपासून इतर शत्रूंपासून संरक्षण मिळाले तरच उद्योगांचा विकास होईल हे महाराजांनी ओळखले होते. त्यामुळे महाराजांनी किल्ल्यावर व्यापार पेठ बसवल्या होत्या. यामध्ये विविध प्रकारच्या वस्तूंचा व्यापार होत असे. छत्रपती शिवाजी महाराज हे थोर अर्थशास्त्रज्ञ होते हे एका छोट्याशा उदाहरणावरून आपणाला लक्षात येतं. त्याकाळात मीठ उद्योग कोकण किनारपट्टीच्या भागांमध्ये महत्त्वपूर्ण असा उद्योग होता आणि हा उद्योग मंदावला अडचणीत आला. त्यांचे कारण असे की. त्याकाळात गोव्यावर्ती पुर्तोगीजांचं राज्य होतं गोव्यामधील मसाले युरोपात न्यायचे प्रचंड पैसा कमवायचा हा व्यवसाय पुर्तोगीजांचा होता . पुर्तोगीजांनी गोव्यातील बारदेश प्रांतातील मीठ कोकण किनारपट्टीवरील मीठाच्या कमी किंमतीत विकायला सुरुवात केली. देशभरातील व्यापारी कोकण किनारपट्टीला ओलांडून स्वस्त किमतीत बारदेशात मिळणारे मीठ विकत घेऊ लागले. आणि त्यामुळे कोकण किनारपट्टीवरील व्यवसाय मंदावला याची माहिती महाराजांना मिळाल्यानंतर महाराजांनी कोकण किनारपट्टी आणि गोव्याची सरहद्द असलेला प्रदेश म्हणजे कुंडाल प्रदेश या कुंडालच्या सुभेदार नरहरी आनंदरावाला पत्र लिहिले. त्यात राजे म्हणतात,

*"बारदेशीचे मीठ महागच पडे ऐसा जकातीचा तह देणे."*

याचा अर्थ बारदेशातून आयात होणाऱ्या मिठावर जब्बर आयात ( जकात) बसवा. पुढे ते लिहितात जर असे केले नाही तर कोकणातील मीठ व्यापारी बारदेशात जातील आणि कोकणातील मीठ उद्योग बंद पडले. आणि मग बारदेशातून येणाऱ्या मिठावर प्रचंड जकात शुल्क बसवली गेली त्याचा परिणाम कोकण किनारपट्टीवरील मीठ स्वस्त झाले आणि देशी उद्योग वाचले. देशी उद्योगाला संरक्षण मिळाले. 19 व्या शतकामध्ये जर्मन अर्थशास्त्रज्ञ फेडरिक लिस्ट यांनी संरक्षणवादी धोरण संबंधी विचार मांडले. या संरक्षण नीतीमुळेच जर्मन राष्ट्र पुढे विकसित राष्ट्र होऊ शकले. फ्रेडरिक लिस्टच्या या धोरणाचा विचारांची अंमलबजावणी छत्रपती शिवाजी महाराजांनी 17 व्या शतकात केलेली दिसून येते. यावरून छत्रपती शिवाजी महाराज एक थोर अर्थशास्त्रज्ञ होते हे लक्षात येईल.आज देखील अनेक उद्योग अडचणीत आहेत त्यांना संरक्षणाची गरज आहे.जर वेळीच त्यांना संरक्षण दिले गेले नाही तर आर्थिक विषमता खुप वाढेल त्यामुळे अशा उद्योगांना संरक्षण देण्याची जबाबदारी शासनाची आहे. तरच सामाजिक आर्थिक समानता येऊन देशाचा विकास खऱ्या अर्थानं होईल यासाठी न्याय जागतिकीकरणाची गरज आहे. भारतील शेती उद्योग सध्या अडचणीत आला आहे.

सध्याच्या परिस्थितीत सरकारला या धोरणाचा अवलंब करणे काळाची गरज बनलेली आहे आज शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य भाव नसल्यामुळे शेतकऱ्यांची अवस्था दयनीय झालेली आहे. 2014 मध्ये सोयाबीनचा किंव्ट्ल ला भाव 4500 रूपये होता. आणि आज 2024 आहे तर सोयाबीनचा भाव 4500 आहे 2014 मध्ये उत्पादन खर्च कमी होते. परंतु आता 2024 मध्ये मात्र उत्पादन खर्च दुप्पट तिप्पट वाढून देखील भाव त्या पटीने वाढला नसल्याने शेतकरी अडचणीत आहे. अशावेळी तरी अडचणीत आलेला शेतकऱ्यांच्या मुलांना त्याच्या कुशलतेनुसार काम मिळत नाही रोजगार नाही शेती परवडत नाही शेतीमधून किफायतशीर उत्पन्न मिळत नाही. आणि त्यामुळे शेतकऱ्यांच्या मुलांची वय वाढत आहेत. त्यांची लग्न होतं नाहीत. शेतकरी आत्महत्येचे प्रमाण वाढलेले आहे. शेतकरी कर्जबाजारीपणा मध्ये अडकलेला आहे. शेतकऱ्यांचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी सरकारने लक्ष देणे गरजेचे आहे. शेतकरी वर्ग असो कामगार वर्ग असो सध्या समाधानी नाही असे चित्र आपणाला दिसून येतं.

**व्यापारावर लक्ष्य**

छत्रपती शिवाजी महाराजांचे व्यापारावर खूप बारीक लक्ष्य होते . असे लक्ष्य सरकारने देशातील सर्व उद्योग व्यवसायावर ठेवणे आवश्यक आहे. तरच देशातील उद्योग व्यवसायाची प्रगती होईल उद्योग व्यवसायाचा ऱ्हास होणार नाही. छत्रपती शिवाजी महाराजांचे उद्योगावर किती बारीक लक्ष्य होते ते पुढील एका उदाहरणावरून लक्षात येईल. १६६१ मध्ये छत्रपति शिवाजी महाराजांनी प्रभावळीच्या सुभेदारास एक पत्र लिहिले. या पत्रात राजे म्हणतात,

*दाभोळास नारळ कमनिर्खे विकते हा अंमल कैसा आहे..*
*आम्ही ठरवून दिलेल्या दरातच नारळाची विक्री व्हावी.*

दाभोळ येथे नारळ अतिशय स्वस्त विकत असल्या कारणाने, त्याचा परिणाम आजूबाजुच्या कोकण परिसरात

नारळाच्या व्यापारावर होऊ लागला, तेंव्हा राजांनी प्रभावळीच्या सुभेदारास सदर पत्र लिहिले होते. यावरून सरकारचे देखील उद्योग व्यापार यावर बारिक लक्ष्य असने किती गरजेचे आहे हे लक्षात येते.छत्रपती शिवाजी महाराजांचे राजकारण अर्थकारण सामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवून केले जात होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी गुलामाचा व्यापार बंद करून टाकला होता. यावरून त्यांचा मानवतावादी उदार दृष्टिकोन स्पष्ट होतो. जगात गुलामगिरी , गुलामांच्या खरेदी विक्री विरूद्ध आवाज 19 व्या शतकात उठलेला दिसतो . 17 व्या शतकात जगात कोठेही गुलामगिरी विरुद्ध आवाज उठलेला नसताना छत्रपती शिवाजी महाराजांनी गुलामांच्या व्यापारावर बंदी घातली. २४ ऑगस्ट १६७७ रोजी छत्रपती शिवाजी महाराजांनी डचांना एक कौलनामा दिला होता. त्या कौलनाम्यातील एक कलम खालीलप्रमाणे आहे '...मुसलमानांच्या राज्यात कोणाकडूनही अटकाव न होता तुम्हाला स्त्री व पुरुष यांची गुलाम म्हणून खरेदी व विक्री करण्याची परवानगी होती; परंतु आता माझ्या राज्यात तुम्हास स्त्री व पुरुषांची गुलाम म्हणून खरेदी व विक्री करण्यास परवानगी नाही. जर तुम्ही तसे करण्याचा प्रयत्न कराल, तर माझे लोक तुम्हास प्रतिबंध करतील. हे कलम कटाक्षाने पाळले पाहिजे.' यावरून छत्रपती शिवाजी महाराजांचा मानवी दृष्टिकोन लक्षात येतोच पण त्यांचे अर्थकारण राजकारण हे रयतेसाठी सर्वसामान्य लोकांसाठी होते हे ही लक्षात येते. आणि सद्यस्थितीत अशाच राजकारण अर्थकारणाची देशाला गरज आहे. तरच खऱ्या अर्थाने देशाचा विकास होईल.

**संदर्भ :**


1. छत्रपती शिवाजी महाराज - प्र. न. देशपांडे, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई (2007)
2. कोळंबे रंजन 2017 भारतीय अर्थव्यवस्था भगीरथ प्रकाशन पुणे
3. सभासद बखर, राजव्यवहारकोश, आज्ञापत्रे – रामचंद्रपंत अमात्य
4. डॉ. संतोष एन. कदम, 'छत्रपती शिवाजी महाराजांचे आर्थिक धोरण , Review of Research, Vol. 8 Issue 2, Nov 2018.
5. https://marathi.indiatimes.com/editorial/samwad/slavery-the-world-and-chhatrapati-shivaji-maharaj/articleshow/100741594.cms
6. https://www.deshdoot.com/featured/jalgaon-shiv-jayanti-wishes-article-19-feb-2020
7. http://shivajimaharajhistoryinmarathi.blogspot.com/2017/07/blog-post.html?m=1
8. https://www.google.com/url?q=http://itihasachyasakshine.blogspot.com/2009/04/%3Fm%3D1&sa=U&ved=2ahUKEwjJgoDa3LKEAxV5rlYBHfUACgAQFnoECAMQAg&usg=AOvVaw1LKdwy_ZDHhjITS6gV2gg_